सामान्य प्रशासन कार्यालय,
आस्थापना विभाग, पुणे मनपा
जा. क्र. :- साप्रवि/आस्था/ ३९९६
दिनांक :- ०८।०६।२०२१

- आ ज्ञा प त्र -

विषय :- श्री.सौरभ विनायक जांभूळकर, लिपिक टंकलेखक, वर्ग-३ विद्युत विभाग यांचा पुणे मनपा सेवेतील राजीनामा मंजूर करणेबाबत...

संदर्भ :-
१) मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज), जा.क्र.अतिमआ/उआ/आस्था/ ३६७७,दि.१३.०७.२०१८
२) श्री.सौरभ विनायक जांभूळकर, लिपिक टंकलेखक, विद्युत विभाग यांचा दिनांक २३.०६.२०२१ रोजीचा विनंती अर्ज.
३) मुख्य अभियंता, विद्युत विभाग, पुणे महानगरपालिका यांचे निवेदन जा.क्र.७२१, दि.२९.०६.२०२१
४) शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२/८, मंत्रालय, मुंबई-३२, दि.०२.१२.१९९७
५) अधिकार सुपुर्ती आज्ञापत्र जा.क्र.मआ/उआ/से/१८०५, दि.०५.१०.२००९
६) मा.उप आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग ठ.क्र. आ/८५, दि. ०६।०६।२०२१

पुणे महानगरपालिका आस्थापनेवर श्री.सौरभ विनायक जांभूळकर यांची विद्युत विभागाकडे लिपिक टंकलेखक, वर्ग-३ (वेतनश्रेणी र.रु.५२०० ते २०२०० + ग्रेड पे १९०० + मान्य भत्ते) या पदावर संदर्भ क्र.१ चे आज्ञापत्रान्वये नेमणूक झाली आहे. श्री.सौरभ जांभूळकर यांनी वैयक्तिक कारणास्तव हे पद सोडत आहे आणि माझ्या कामाचा शेवटचा दिवस ३१ जुलै २०२१ असेल. सदरचा अर्ज हा मी कुठल्याही दबावाखाली न येता, माझ्या मर्जीने व राजीखुशीने सादर करीत आहे. असे नमूद करून राजीनामा मंजूर करणेबाबत मा.मुख्य अभियंता, विद्युत विभाग यांचेकडे संदर्भ क्र.२ अन्वये विनंती अर्ज केला आहे.

श्री.सौरभ विनायक जांभूळकर यांनी मा.मुख्य अभियंता, विद्युत विभाग यांचेकडे केलेली विनंती, सदर सेवकाने दिलेला राजीनामा स्वीकृत करणेस मा.मुख्य अभियंता, विद्युत विभाग यांनी संदर्भ क्र.३ अन्वये केलेली शिफारस विचारात घेवून, संदर्भ क्र.५ चे अधिकार सुपूर्ती आज्ञापत्रान्वये प्राप्त अधिकारात श्री.सौरभ विनायक जांभूळकर यांचा दि.३१.०७.२०२१ पासून महानगरपालिका सेवेचा राजीनामा स्वीकृत करून त्यांना पुणे महानगरपालिका सेवेतून सेवामुक्त करणेस संदर्भ क्र.६ च्या ठरावान्वये मान्यता देण्यात येत आहे.

त्यानुसार श्री.सौरभ विनायक जांभूळकर, लिपिक टंकलेखक, वर्ग-३ (वेतनश्रेणी र.रु.५२०० ते २०२०० + ग्रेड पे १९०० + मान्य भत्ते) यांना दि.३१.०७.२०२१ रोजी कार्यालयीन वेळेनंतर पुणे महानगरपालिका सेवेतून सेवामुक्त करण्यात येत आहे.

तरी, संबंधीत मा. खातेप्रमुख यांनी सदर आज्ञापत्राची नोंद संबंधीत सेवकाच्या सेवापुस्तकात करून त्यांचेकडून मनपाची येणे बाकी असल्यास वा निघाल्यास ती वसुल करण्याची तजवीज करावी.

(सुनिल इंदलकर)
उप आयुक्त
सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका

प्रत :-
१) मा. संबंधीत खातेप्रमुख, पुणे महानगरपालिका
यांजकडे पुढील तजवीजीसाठी रवाना...
२) श्री.सौरभ विनायक जांभूळकर
यांना मा.मुख्य अभियंता, विद्युत विभाग, पुणे महानगरपालिका यांचेमार्फत ....